**सोलापूर विद्यापीठ**
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

**SOLAPUR UNIVERSITY**
Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-124
Email : bcudsu@gmail.com


**Ref. No. : SUS/BCUD/PGBUTR/2014-15/** 9231 **Date:** 18 DEC 2014

# परिपत्रक

**प्रति,**
मा. प्राचार्य / मा. संचालक
सर्व संलंग्नित मान्यताप्राप्त
एम.फिल. / पीएच.डी. अभ्यासक्रम संचलित महाविद्यालये / सर्व संबधित विषयातील मान्यताप्राप्त संशोधक मार्गदर्शक
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय** - पीएच.डी. प्रबंध मराठी भाषेमध्ये लिहिण्यास देण्यात येणा-या परवानगीबाबत.

महोदय,

सोलापूर विद्यापीठातंर्गत पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेशित विद्यार्थी पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या नियम क्र. R.Ph.D. १९ मधील तरतूदीनुसार त्यांचा शोधप्रबंध मराठीमध्ये लिहिण्यासाठी परवानगी मागणारे अर्ज संशोधक मार्गदर्शकांमार्फत या कार्यालयास सादर करतात. अशा अर्जाची प्रक्रिया होण्यास व संशोधन व मान्यता समितीची बैठक नजीकच्या काळात होणार नसल्यास विद्यार्थ्यास वेळेवर प्रबंध सादर करता येत नाही व अंन्य प्रशासकीय अडचणी निर्माण होतात, असे निदर्शनास आले आहे. सदर बाबीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

याबाबत आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यास मराठीमधून पीएच.डी. अभ्यासक्रमाचा प्रबंध पूर्ण करावयाचा आहे, त्यांनी प्रवेश घेतानाच आपला संशोधन आराखडा मराठी मध्येच संशोधन व मान्यता समितीसमोर सादर करावा. पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतानाच प्रबंधाकरिता मराठी माध्यमाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. प्रवेश निश्चीत झालेनंतर मराठीतून शोधप्रबंध लिहिणेची परवानगी मागणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

सदरचे परीपत्रक सर्व संशोधक विद्यार्थी व संशोधन मार्गदर्शक यांच्या निदर्शनास आणून दयावे. ही विनंती.

कळावे.

आदेशान्वये

**प्राचार्य बी. एम. भोंजे**
**संचालक**
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

E:\shirish\PGBUTR\General Shirish.doc